**निशाण क्र. २३ वरील आदेश**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख यांच्या द्वारे दावा मिळकत व गट क्र. ४७३ या मिळकतींची मोजणी व हद्दी खुणा निश्चित होण्याकरीता दाखल केला आहे.

२. त्यांच्या म्हणण्यानुसार दावा मिळकत त्यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीची आहे, दावा मिळकतीच्या पश्चिमेस प्रतिवादींची गट क्र. ४७३ ही मिळकत आहे. दोन्ही मिळकतींच्या हद्दीवर पुरातन दगडी कुंपण आहे. मात्र प्रतिवादींनी कैफियतीमध्ये या दोन्ही मिळकती एकमेकास लगत नसून दोन्ही मिळकतींमधून जाणारी वाट असल्याचे कथन केले आहे. वादातीत कथनांवरुन वादी प्रतिवादींमध्ये दोन्ही मिळकतींच्या हद्दीवरुन वाद असल्याचे दिसून येते. प्रतिवादींनी कैफियतीमध्ये दोन्ही मिळकतींमधील हद्द मोजणीद्वारे निश्चित करुन घेण्यास त्यांची तयारी असल्याचे कथन कले आहे. सबब, वादी प्रतिवादींमधील दावा मिळकत व प्रतिवादींच्या मिळकतीमधील असलेल्या हद्दीबाबतचे वादाचे स्वरुप विचारात घेता दोन्ही मिळकतींची मोजणी होवून हद्दी निश्चित केल्यास वादी प्रतिवादींमधील हद्दीबाबतच्या वादाचे अंतिम निराकरण होवू शकते. सबब, या कारणास्तव तालुका निरिक्षक भूमी अभिलेख देवगड यांच्याद्वारे दोन्ही मिळकतींची मोजणी होवून हद्दी निश्चित होणेबाबत आदेश होण्यासाठी वादींनी विनंती केली आहे.

३. प्रतिवादींनी निशाण क्र. २४ ला सदर अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सदरचा अर्ज खोटा व बेकायदेशीर आहे. केवळ पुरावा गोळा करण्यासाठी वादीने प्रस्तुतचा अर्ज दिला आहे. वादींनी दाव्यामध्ये हद्द निश्चितीबाबत कोणतीही दाद मागितली नाही. वादी म्हणतात त्याप्रमाणे न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करण्याची आवश्यकता नाही. रस्त्याबाबतचा पुरावा गोळा करण्यासाठी न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करता येणार नाही. प्रतिवादींनी केलेल्या

कथनांचा वादींनी गैरअर्थ लावला आहे. परिणामी प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे. तरी देखील न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करणे योग्य वाटत असल्यास वादींच्या खर्चाने सदरची नियुक्ती करण्यात यावी, अशी वैकल्पिक विनंती प्रतिवादींनी केली आहे.

४. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

५. वादींनी दाव्यामध्ये त्यांच्या दावा मिळकतीच्या पश्चिमेस प्रतिवादींची मिळकत आहे, दावा मिळकत व प्रतिवादींच्या मिळकतीच्या हद्दीवर पुरातन दगडी कुंपण आहे, त्यांची मिळकत व प्रतिवादींच्या मिळकतीच्या हद्दीवरुन वाद सुरु झाले आहेत, प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये वहिवाट करणार असल्याचे, वादीचे कुंपण तोडणार असल्याचे बोलून दाखवत आहेत असे कथन केले आहे. याउलट प्रतिवादींनी कैफियतीमध्ये दोन्ही मिळकतीमध्ये १० फूट रुंदीचा रस्ता आहे, वादींनी दावा मिळकतीची हद्द प्रतिवादीच्या मालकीच्या गट क्र. ४७३ मध्ये असल्याची खोटी विधाने केली आहेत, प्रतिवादींनी वादींना दोन्ही मिळकतींची हद्द ठराव मोजणी करुन घेण्याचे सुचविले होते, मात्र वादींनी मोजणी करुन घेण्यास नकार दिला, वादी हे हद्दीवरुन विनाकारण वाद निर्माण करत आहेत असे कथन केले आहे.

६. वरील वादातीत कथनावरुन वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये त्यांच्या मिळकतींच्या दरम्यान असलेल्या हद्दीबाबत वाद असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. ज्या प्रकरणामध्ये हद्दीबाबत वाद असतात त्या प्रकरणामध्ये भूकरमापक/निमतानदार यांच्याद्वारे दोन्ही मिळकतींची मोजणी करुन घेवून हद्दी निश्चित करुन घेणे अनिवार्य आहे असे कायदयाचे प्रचलित तत्व आहे. त्यामुळे या प्रकरणी वादींची दावा मिळकत व प्रतिवादींची गट क्र. ४७३ या मिळकतीची मोजणी होवून हद्दी निश्चित करण्याकरीता भूकरमापक/निमतानदार यांची नियुक्ती करणे न्यायोचित वाटते. प्रतिवादींनी

त्यांच्या कैफियतीमध्ये दोन्ही मिळकतींची हद्द ठराव मोजणी करुन घेण्याची त्यांची तयारी आहे असे स्पष्टपणे कथन केले आहे. सबब, या कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालील आदेश पारित करीत आहे :

— **आदेश** —

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. उप अधिक्षक भूमी अभिलेख देवगड यांच्या कार्यालयातील भूकरमापक/निमतानदार यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येते. त्यांनी मौजे बागमळा तालुका देवगड येथील दावा मिळकत व गट क्र. ४७३ या मिळकतीच्या सह हिस्सेदारांना, वादी, प्रतिवादींना मोजणीची पुर्व सुचना देणारी नोटीस काढून सदर दोन्ही मिळकतींची मोजणी करुन हद्दी निश्चित कराव्यात. त्याबाबत त्यांनी मोजणीचा नकाशा तयार करावा. त्यांनी सदर मोजणीचा अहवाल व नकाशा एक महिन्याच्या आत त्वरीत न्यायालयात सादर करावा.

३. सदरची मोजणी अतितातडीने करण्यात यावी.

४. वादींनी मोजणीसाठी आवश्यक असणारे शुल्क व कागदपत्रे आजपासून ७ दिवसाचे आत जमा करावेत.

५. वादींनी वरील पुर्तता केल्यानंतर संबंधीत कार्यालयास पत्र पाठविण्यात यावे.

देवगड
दिनांक ०३/०१/२०१७

( गि. सु. माने )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर देवगड.